**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
प्राप्त झालेले व्दितीय अपील
**अपील क्रमांक : १०३२/२०१९**

**अपिलार्थी, श्री.कमलकिशोर कांतीलाल जैन,**
**रा.नवजीवन टेरेसेस, फ्लॅट क्र.२०४, सातव चौक, जठारपेठ, अकोला, ता.जि.अकोला.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**गट ग्रामपंचायत चोंढी, ता.पातुर, जि.अकोला**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, पातुर, ता.पातुर, जि.अकोला.**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०८.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : अनुपस्थित**
**प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १९.०६.२०१८ | निरंक | ०१.०८.२०१८ | ३०.१०.२०१८ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १९.०६.२०१८** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " दलित वस्तीतील एबीसीसी सन २०१७-१८ यातील काम केलेल्या रस्त्यांची माहिती, १४ वा वित्त आयोग आलेले पैसे एमबीसीसी इस्टीमेट सन २०१६-१७, २०१८ याचा पुर्ण आराखडा, आमचे गावं आमचा विकास कृती आराखडा, १३व्या वित्त आयोगात केलेल्या कामाची एमबीसीसी स्थळ निरीक्षणाचा नकाशा, रोजगार हमी योजने अंतर्गत केलेल्या कामाचो माहिती इत्यादी माहिती" मागितलेली आहे. सदर माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत अपीलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होवून **दिनांक ०१.०८.२०१८ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ३०.१०.२०१८ रोजी सुनावणी घेऊन "जन माहिती अधिकरी यांनी माहितीचा अर्ज दि.१९.०६.२०१८ नूसार उपलबध माहिती अर्जदार यांना ८ दिवसात विनामुल्य पुरविण्यात यावी व माहिती दिल्याची पोच कार्यालयात सादर करावी." असे नमूद करुन आदेश पारीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०९.०४.२०१९ रोजी** " माहिती मिळाली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक ०१.०८.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. उत्तरवादी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान अपिलकर्ता यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलकर्ता श्री.कलमकिशोर जैन यांनी दि.१९.०६.२०१८ रोजीच्या जोडपत्र-अ नूसार वरील प्रमाणे माहिती मागितली असून, यात विहीत मुदतीत कुठलीच माहिती प्रदान न झाल्यामुळे दि.०१.०८.२०१८ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल करण्यात आला. त्यावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.३०.१०.२०१८ रोजी सुनावणी घेवून, अर्जदार यांना विनामुल्य माहिती ८ दिवसात प्रदान करण्याचे निर्देश दिले आहे. वरील आदेशाचे अनुपालन झाले नसल्याची वस्तुस्थिती लक्षात घेत, श्री.जैन यांनी दि.०९.०४.२०१९ रोजी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केला आहे. या प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारित केलैल्या आदेशाची अंमलबजाणी झाली नसल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द कलम १९ (८) (ग) व २० (१) नूसार अधिकतम शास्तीची कार्यवाही का करण्यात येवू नये ? याबाबतचा स्वयंस्पष्ट लेखी खुलासा दोन आठवड्याच्या आत आयोगास सादर करावा. वरील खुलासा सादर करण्याची संधी शेवटची असून, दोन आठवड्यात खुलासा प्राप्त न झाल्यास एकतर्फी कार्यवाही करण्यात येईल. याबाबत नोंद घ्यावी.

अंतरिम आदेश

**प्रथम अपिलीय अधिकारी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ८ दिवसात विनामुल्य माहिती प्रदान करण्याचे निर्देश दिले. तथापि, जन माहिती अधिकारी यांनी पारित आदेशचे अनुपालन केले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (८) (ग) व २० (१) नूसार अधिकतम शास्तीची कार्यवाही का करण्यात येवू नये ? याबाबतचा स्वयंस्पष्ट लेखी खूलासा दोन आठवड्याच्या आत आयोगास सादर करावा. दोन आठवड्यात खुलासा प्राप्त न झाल्यास एकतर्फी कार्यवाही करण्यात येईल.**

सही/-

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ अमरावती

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : ०१.०८.२०२४**
जावक क्रमांक ६०३६ दिनांक ०३.०९.२०२४

**अपील क्रमांक :- १०३२/२०१९**

**अपीलार्थी, कमलकिशोर कांतीलाल जैन.**

**सुनावणी दिनांक १७.०४.२०२५(In Continuation of Order dt.०१.०८.२०२४)**



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती

वरील पारित आदेशाचे अनुपालनासाठी सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १७.०४.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.आर.एच.देशमुख, सचिव व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.शशीकांत यशवंत उमाळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी हे उपस्थित आहेत.

**विवेचन**

अपिलार्थी यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांना अद्याप पर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र देशमुख यांनी असे कथन केले की, अपिलार्थी यांनी ज्या विषयासंबंधीत माहिती मागितलेली आहे त्या संबंधीचा अभिलेख त्यांना त्यांचे पुर्वी कार्यरत असलेल्या ग्रामसेवकाकडून प्राप्त झालेला नाही. आपण सदरचा अभिलेख प्राप्त न झाल्याबदल पंचायत समिती, पातुर यांचेशी पत्रव्यवहार केलेला आहे. तथापि, पंचायत समती, पातुर मार्फत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. सबब, माहितीचा अधिकारी अधिनियम, २००५ चे कलम १९ (१०) नूसार खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांनी मागणी केलेला दस्तऐवज विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, गट ग्रामपंचायत चोंढी, ता.पातुर, जि.अकोला या ग्रामपंचायतीच्या तत्कालीन सचिवाने विद्यमान सचिवाकडे हस्तांतरित न केल्याने विद्यमान गट विकास अधिकारी, पातुर यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ मधील तरतुदीनूसार कार्यालयीन अभिलेख जतन न करण्याबाबत किंवा गहाळ करण्याबाबत कार्यालयातील जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील त्यांचेवर जबाबदारी निश्चीत करण्याकरीता चौकशी करावी. चौकशीमध्ये सर्व संबंधितांचे लेखी जबाब घेऊन जे अधिकारी/कर्मचारी दोषी आढळतील त्यांचेविरुध्द महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ मधील कलम ९ नूसार कार्यवाही करावी व तसा अनुपालन अहवाल कार्यालय प्रमुख तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पातुर यांनी पुढील सुनावणीचे वेळी व्यक्तिश: सादर करावा.
२. प्रस्तुत प्रकरणात पुढील सुनावणी दि. 12.06.2025 रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : १७.०४.२०२५**
जावक क्रमांक ९८०३ दिनांक 27 MAY 2025